# नाण्याची दुसरी बाजू

मटा फॅमिली

**बदललेल्या परीक्षा पद्धतीने मुलांवरचा ताण खरोखरीच कमी होतो का हे आपल्याला कळेलच; पण आता कोणी नापास होणार नसल्याने, पालकांना आपल्या मुलांच्या अभ्यासातील समस्या सोडवण्याची गरज मात्र नक्कीच वाटत नाही.**

प्राचीचे आईवडील त्रस्त चेहऱ्याने माझ्यासमोर बसले होते. सलग दुसऱ्या परीक्षेत प्राचीला प्रत्येक विषयात चाळीस पैकी तीन किंवा चार मार्क होते. प्रगतीपुस्तकात आता मार्काऐवजी शेरे होते; पण म्हणून पेपरमधील लाल रेघा झाकल्या जात नव्हत्या. सविस्तर माहिती घेऊन तिच्याशी बोलून, बौद्धिक मापनाच्या परीक्षा घेऊन एक लक्षात आलं होतं, की प्राचीचा बुद्ध्यांक खूप कमी होता. भाषा आणि गणित विषयाची समज तिच्या वयापेक्षा तीन ते चार वर्ष मागे होती. आणखीही बऱ्याच समस्या होत्या. या समस्या जेव्हा तिच्या पालकांना समजावल्या आणि प्राचीला इंग्रजी माध्यम झेपत नाहीए, तिला मराठी माध्यमाच्या शाळेत घालावं शिवाय गतीमंद मुलांची शाळा असा पर्यायही चांगला होऊ शकतो वैगरे सल्ला दिला तेव्हा ते दोघंही जवळजवळ माझ्या अंगावर धावून आले.

'आमची मुलगी मतिमंद आहे, वेडी आहे असं म्हणायचं आहे का तुम्हाला? आम्ही तिला कोणत्याही शाळेत घालू, तुमचा काय संबंध? आणि शाळा किंवा माध्यम कशाला बदलायचे? आता नव्या शिक्षणपद्धतीत कोणाची हिंमत आहे तिला नापास करायची? आम्ही कोर्टात केसच करू.' परीक्षांचा ढाचा बदलला, शिक्षणपद्धतीने मुलांना नापास न करण्याची आज्ञा केली आणि पालकांची ही दुसरी बाजू उफाळून वर यायला लागली.

अनेक पालक माझ्याकडे मुलांच्या विविध समस्या घेऊन नेहमीच येतात. अध्ययन अक्षमता, अतिचंचलता, स्वमग्नता, गतिमंदत्व अशा अनेक कारणांनी मुलं अभ्यासात मागे पडत असतात. कधी मुलांना इंग्रजी माध्यम झेपत नसतं आणि त्यात पालकांच्या अपेक्षांचे ओझे! 'मुलांच्या समस्या तुम्ही औषधं वैगरे देऊन झटपट सोडवा,' असाच पालकांचा आग्रह नेहमी असतो. त्यासाठी वारंवार समुपदेशनासाठी यायला किंवा स्वतःहून आपल्या पालकत्वात,घरच्या वातावरणात किंवा अभ्यास घेण्याच्या पद्धतीत काही चांगले बदल करायला सांगितले तर पालक ते नाराजीनेच करतात. आतापर्यंत परीक्षांचा धाक होता, मार्कांचा बडगा होता. नापास होण्याची भीती होती.

शाळेने मुलाला परत त्याच वर्गात ठेवण्याची सुचना केली मग पालक अनिच्छेने का होईना समुपदेशकाकडे यायचे. आपल्या पाल्याची समस्या जाणून घ्यायचा, तिचं निराकरण करण्याचा प्रयत्न करायचे. आता नापास होण्याची भीती संपली आणि पालक निर्ढावले. 'स्वमग्नता' असलेल्या एका मुलाच्या वडिलांनी मला चक्क सांगितलं, 'अहो डॉक्टर, तुम्ही का एवढ्या हैराण होताय, माझ्या मुलासाठी? भले तो काही शिको; पण पुढच्या इयत्तेत तर जाईल ना, तुम्हाला औषधांनी जमेल तितकी सुधारणा करा, पुढचं आम्ही बघून घेऊ.'

बदलेल्या परीक्षा पद्धतीचे साइड इफेक्ट्स असे भयावह पद्धतीने मला जाणवू लागले आहेत. मुलांवरचा ताण कमी व्हावा म्हणून परीक्षांचे स्वरूप बदललं. परीक्षांबरोबर गृहपाठ, शाळेच्या वह्या, वर्गात उत्तर देणे, गटचर्चा यावरही गुण मिळू लागले.

तेव्हा चाणाक्ष पालकांनी आपल्या मुलाने शिक्षकांवर प्रभाव पाडावा यासाठी मुलांना व्यक्तिमत्व विकासाच्या क्लासना घालायला सुरुवात केली. 'वर्गात तू पुढे पुढे कर, शिक्षकांची कामे कर, त्यांना खूष ठेव. मग तू त्यांच्या लक्षात राहिलास की तुला वर्गातल्या वागण्याचे संपूर्ण मार्क देतील,' असा हुशार सल्ला काही पालकांनी मुलांना दिला.

घरी करायला लागणारे प्रोजेक्ट पालक स्वतःच करायला लागले म्हणजे त्यात पूर्ण मार्क मिळणारच. आणि जी मुलं काही समस्यांमुळे अभ्यासात मागे पडत होती त्यांचा तर गृहपाठही आया करून द्यायला लागल्या कारण गृहपाठाच्या वहीला मार्कस् आहेत ना...!



## प्रबोधनाची गरज

**ज्या मुलांना शैक्षणिक समस्या आहेत त्यांना योग्य मार्गदर्शन, उपचार आणि समुपदेशन मिळावं असं बंधन पालकांवर येणं आता आवश्यक आहे. शाळांच्या नियमांत, सरकारी कायद्यात अशा प्रकारच्या गोष्टींचा समावेश आता अपरिहार्य आहे. अन्यथा ही मुले फक्त वरच्या वर्गात जात राहतील आणि खरे शिक्षण त्यांना कधीच मिळणार नाही. ज्या वेळी या मुलांच्या समस्या खऱ्या अर्थाने समोर येतील त्यावेळी त्या सुधारण्याची वेळ निघून गेली असेल आणि तोपर्यंत या मुलांचं, त्यांच्या भविष्याचे अपरिमित नुकसान झालं असेल. तेव्हा पालक आणि शिक्षकांमध्ये या समस्यांची सखोल माहिती देऊन प्रबोधन घडवून आणणं ही आजची प्रमुख गरज आहे.**

**डॉ. मीनल सोहोनी**